
# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ०५ | बुधवार,दि.०८ जानेवारी २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# छत्तीसगडमध्ये पोलिसांच्या वाहनावर नक्षलवाद्यांकडून स्फोटक हल्ला;नऊ पोलीस जागीच ठार!



**गोंदिया:** छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी मोठा हल्ला केला आहे. सोमवारी पोलीस कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या एका वाहनाला नक्षलवाद्यांनी स्फोटक यंत्राने उडवल. या घटनेत आठ पोलीस आणि एक चालक असे एकूण ९ जण शहीद झाले आहेत.

विजापूर जिल्ह्यातील बेद्रे-कुटू रोडवर हा स्फोट झाला. ५ जानेवारी रोजी (रविवारी) केलेल्या नक्षलविरोधी मोहिमेतून परतत असलेले किमान २० जवान या वाहनात होते. यावेळी नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोट घडवून आणला. या स्फोटात आठ जवान आणि चालकासह एकूण नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. छत्तीसगडच्या बस्तर भागात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी मारले गेले होते. त्यानंतर हा हल्ला करण्यात आला. नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमेवरील दक्षिण अबुझमाड येथील जंगलात शनिवारी संध्याकाळी सुरक्षा दलाच्या जवानांचे संयुक्त पथक नक्षलवादविरोधी मोहिमेवर असताना चकमक झाली. रविवारी सुरुवातीला चार नक्षलवादी मृतावस्थेत आढळले, तर आणखी एक मृतदेह नंतर सापडला, असे एका अधिकाऱ्याने पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले. दंतेवाडा डीआरजी हेड कॉन्स्टेबल सन्नू करम हे देखील कारवाईदरम्यान शहीद झाले.







## शहीद झालेल्या जवानांची नाव

**बुधराम कोरसा ग्राम बड़े तुंगाली, पोस्ट जिल्हा बीजापुर, सोमडू वेट्टी ग्राम परचेली बंडीपारा तह. कटेकल्याण जिल्हा दंतेवाड़ा, सुदर्शन वेट्टी ग्राम पो. गुमलनार गिरसापारा तह.गीदम जिल्हा दंतेवाडा, सुबरनाथ यादव ग्राम पो. छोटे तुमनार थाना तह.गीदम जिल्हा दंतेवाड़ा, हरीश कोर्राम पता गढ़मिरी पोस्ट नकुलनार तह.कुआकोण्ड़ा जिल्हा दंतेवाड़ा, डूम्मा मरकाम ग्राम पंचायत मड़कामीरास पोस्ट गुमियापाल तहसील बड़े बचेली जिल्हा दंतेवाड़ा, पण्डरू राम पोयाय ग्राम कावड़गाँव रीमापारा पोस्ट कावड़गॉव तह. दंतेवाड़ा जिल्हा दन्तेवाड़ा, बामन सोढ़ी ग्राम करकावाड़ा पोस्ट नेलसनार तह. भैरमगढ़ जिल्हा बीजापुर, वाहन चालक (सिविल)- तुलेश्वर राना ग्राम आरापुर जगदलपुर**

### शुक्रवारी तीन नक्षलवादी ठार

**तत्पूर्वी, शुक्रवारी छत्तीसगडमधील गरीबीबंद जिल्ह्यातील कंदेशर गावात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. चकमकीच्या ठिकाणाहून शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.**

छत्तीसगडच्या नारायणपूर-दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवरील दक्षिण अबुजमढ जंगल परिसरात नक्षलविरोधी कारवाई करण्यात आली, असे आयजी बस्तर यांनी सांगितले. हे STF Zo नारायणपूर, दंतेवाडा, जगदलपूर आणि कोंडागाव जिल्ह्यातील डीआरजी संघांच्या समन्वयाने केले.

# पंचायत समिती सभापती पदाची आरक्षण सोडत सभा शुक्रवारी

**गोंदिया :-** ग्रामविकास विभागाकडील अधिसुचना दिनांक ०४/१०/२०२४ नुसार गोंदिया जिल्ह्यातील सर्व ८ पंचायत समितींच्या सभापती पदांचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे.

याकरिता शुक्रवार, १० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांनी उपस्थित रहावे, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.



# शिक्षणाधिकाऱ्याने विद्यार्थ्यांचा विमा उशीरा काढल्याने पालकांना भुर्दंड

## अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात हयगय

**गोंदिया:**जि.प.शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील कला गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी जिल्हा परिषदेच्या वतीने अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवादरम्यान आयोजित क्रीडा स्पर्धामध्ये अपघात होण्याचा धोका नेहमीच असतो. त्यामुळे दरवर्षी सहभाग घेणाऱ्या २ हजार विद्यार्थ्यांचा सामुहिक विमा काढण्यात येतो. परंतु, सन २०२३ च्या अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा विमा काढण्यास शिक्षण विभागाने तब्बल महिनाभराची दिरंगाई केली. यामुळे स्पर्धेदरम्यान जखमी झालेल्या तीन विद्यार्थ्यांना विम्याचा लाभापासून मुकावे लागले. तर त्यांच्या पालकांना उपचारासाठी मानसिक व आर्थिक भुर्दंड सोसावा लागला. या प्रकाराने शिक्षण विभागाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर आला असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला घेवून शिक्षणाधिकारी किती गंभीर आहेत? हे या प्रकारावरून दिसून येत आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना चालना मिळावी व क्रिडा गुणांचा विकास व्हावा, यासाठी अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवात जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांचा सहभाग असतो. जवळपास २ हजार विद्यार्थी यामध्ये सहभागी होत असतात. यामुळे क्रीडा महोत्सवादरम्यान कोणत्याही प्रकारची अनुचित व अप्रिय घटना होवू नये, याकरीता विविध खबरदारी घेतली जाते. तर अपघाताची शक्यता लक्षात घेता २ हजार विद्यार्थ्यांचा सामुहिक विमा काढण्यात येतो. सन २०२३ मध्ये आयोजित अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात २० नोव्हेंबर २०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आदेश देत येणाऱ्या खर्चाला प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली होती. तसेच योजनेसंदर्भाने द ओरीयंटल इन्शुरंन्स कंपनी लि.व्दारे एकूण २ हजार विद्यार्थ्यांचा विमा काढण्यात आला. सदर विमा हा २० डिसेंबर २०२३ ते १९ जानेवारी २०२४ या कालावधीपर्यंतचा होता. अशातच स्पर्धेच्या आयोजनादरम्यान ८ डिसेंबर २०२३ रोजी महेंद्र जीवनलाल पारधी (वर्ग-४ था) जि.प.प्राथमिक शाळा बिरसी पं.स.तिरोडा तर ११ डिसेंबर २०२३ रोजी अभय गोपाल मंडल (वर्ग-७), जि.प.प्राथमिक शाळा रामनगर, पं.स.अर्जुनी मोरगाव या विद्यार्थ्यांचा अपघात होवून जखमी झाले होते. त्यापैकी महेंद्र पारधी याचा प्रस्ताव २ जानेवारी २०२४ रोजी व अभय मंडल यांचे प्रस्ताव १४ डिसेंबर २०२३ जि.प.कडे पाठविण्यात आले. परंतु, शिक्षण विभागाने विमा काढण्यास दिरंगाई केल्याने अपघातग्रस्त विद्यार्थी विम्यास अपात्र ठरले व लाभापासून वंचित राहिले. यामुळे त्यांच्या पालकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला. सोबतच त्या शाळेतील शिक्षकांना सुध्दा रोषाला समोर जावे लागले. हा सर्व प्रकार शिक्षण विभागाच्या प्रतापाने झाला. मुख्यकार्यपालन अधिकारी यांनी सुचना दिली असताना विद्यार्थ्यांचा विमा काढण्यास लेटलतिफ्फी का करण्यात आली? स्पर्धेच्या प्रारंभी विमा काढण्याचे सोडून एक महिना उशिरा विमा काढण्याचे शहाणपण होत असेल तर जिल्हा परिषदेचे प्रशासन कसे सुरू आहे? याचा अंदाज येतो. हा प्रकार म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करण्यासारखा असून जि.प.च्या कर्तव्यनिष्ठ मुख्य पालन अधिकाऱ्यांनी दखल घेवून त्या दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी? अशी मागणी पालकांकडून केली जात आहे.

### जि.प.सदस्य माधुरी रहांगडाले यांनी उपस्थित केला मुद्दा

विशेष म्हणजे, या प्रकरणासंदर्भात जि.प.सदस्य ॲड.माधुरी रहांगडाले यांनी हा मुद्दा अर्थ समितीच्या ६ डिसेंबर २०२४ च्या सभेत उपस्थित केला. दरम्यान अर्थ व बांधकाम सभापती यांनी सदर प्रकरणाचे बोध घेवून चौकशी करून अहवाल सादर करण्याबद्दल निर्देशित केले होते. दरम्यान मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या चौकशीत प्राथमिक शिक्षण विभागाने वेळेवर विमा न काढल्याने अपघातग्रस्त विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागला असून याला प्राथमिक शिक्षण विभागातील नस्ती हाताळणारे अधिकारी व कर्मचारी जबाबदार असल्याचे नमुद केले आहे. आता या घटनेमुळे जि.प.च्या प्रशासकीय कामाला गालबोट लागले आहे. जबाबदार अधिकारी, कर्मचाऱ्यांवर मुकाअ कोणती कारवाई करतात,याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.



## वाघाचे तीन तुकडे करून जंगलात फेकले, शिकार की झुंज

**भंडारा :-** तुमसर तालुक्यातील तुमसर वनपरिक्षेत्रांतर्गत येत असलेल्या झंजेरिया गावाजवळील घनदाट जंगलात एक वाघ मृत अवस्थेत आढळून आला, विशेष म्हणजे त्याच्या मृतदेहाचे तीन तुकडे आढळल्याने एकच खळबळ उडाली असून मृत वाघाचे तुकडे करून जंगलात कुणी फ्रेकले, या दिशेने शोध सुरू झाला आहे.

ही घटना सकाळी ९ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. विशेष म्हणजे, मृतावस्थेत आढळलेला वाघ तीन तुकड्यात दिसून आला. पंधरा दिवसातील वाघ मृत आढळल्याची दुसरी घटना आहे. ही शिकार की वाघाच्या झुंजीत मृत्यू झाला याचा वन विभागाकडून शोध सुरू आहे. तुमसर वन परिक्षेत्रात मागील काही दिवसांपूर्वी वाघाचे दर्शन झाल्याने येथील भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ८ दिवसांपूर्वी तुमसर येथे एक वाघ मृतावस्थेत आढळून आला होता. त्यानंतर आज सकाळी एका वाघाचे दोन तुकडे करून त्याची शिकार केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. याबाबत माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

# नवेगावबांध पर्यटक निवासाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण



**गोंदिया:-** विदर्भातील गोंदिया जिल्ह्यामधे एमटिडीसीचे नवेगाव बांध पर्यटक निवास नवेगाव नागझीरा व्याघ्र प्रकल्पाच्या भोवती शाश्वत रित्या उभारले असून ते पर्यटकांना पर्वनी ठरेल असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.मंत्रालय येथील मंत्रिमंडळ बैठकीनंतर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नवेगाव बांध लोकार्पण सोहळा आभासी पद्धतीने पार पडला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,पर्यटन मंत्री शंभूराज देसाई,पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक,पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकी संचालक मनोजकुमार सूर्यवंशी उपस्थित होते.नवेगावबांध येथील पर्यटक निवासस्थानी आयोजित कार्यक्रमाला अर्जुनी मोरगाव मतदारसंघाचे आमदार व माजी मंत्री इंजि.राजकुमार बडोले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल,मपविम मुंबईचे अधिक्षक अभीयंता शैलेंद्र बोरसे, प्रादेशिक कार्यालय, नागपूर चे वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक दिनेश कांबळे यांनी पुढाकार घेतला.

### नवेगाव बांध हे एक आदर्श पर्यटन स्थळ

२२ नोंव्हेंबर, १९७५ या दिवशी अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आलेले हे घनदाट जंगल गोंदिया जिल्ह्याच्या दक्षिणेला असून गोंदियापासून ६५ कि.मी. अंतरावर नवेगावबांध येथे राष्ट्रीय पक्षी उद्यान आहे. वनश्रीने नटलेल्या या उद्यानाचा परिसर १६५ चौ.कि.मी. आहे. येथील तलाव व वनक्षेत्र पक्षांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. येथे सैबेरियासारख्या अतिदूर प्रदेशाहून येणारे पक्षी विशिष्ट हंगामात दरवर्षी येतात. नवेगांव बांध हा तलाव सुमारे ११ वर्ग कि.मी. परिसरात पसरलेला आहे. या तलावाच्या मध्यभागी प्रेक्षणीय असे ममालडोंगरीफबेट आहे. या जंगलाचा भाग हा नागझिरा अभयारण्यापासून सुरु होऊन गडचिरोली जिल्ह्यातून थेट छत्तीसगढपर्यंत जातो. असे म्हटले जाते की, हा जंगलप्रदेश हत्तींचा येण्या-जाण्याचा मार्ग होता व म्हणूनच नागझिरा अभयारण्यातील हत्तीखोदरा व नवेगांव अभयारण्यातील हत्तीपंगडी या ठिकाणांना तशा प्रकारची नावे मिळाली.

नवेगाव बांध हे एक आदर्श पर्यटन स्थळ आहे, जिथे तुम्ही बोटिंग करू शकता,पक्षी निरीक्षण करू शकता आणि आसपासच्या जंगलातील विविध प्राणी पाहू शकता. येथील प्राचीन आणि शांत वातावरण पर्यटकांना निसर्गाच्या जवळ आणते.

### सर्व सोयीसुविधाने सज्ज पर्यटक निवास

नवेगावबांध या पर्यटन स्थळी पर्यटकांना राहण्याकरीता महामंडळाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून रु. २१.०० कोटीच्या निधीतुन उत्तम सुविधेने सज्ज असलेले पर्यटक निवास चांदपूर या नावाने सुरू केलेले आहे. येथे तखझ सूट, डीलक्स सूट, स्टॅंडर्ड सूट आणि ८ बेडेड डॉर्मिटरी, उपहारगृह आणि मनोरंजनासाठी स्विमींगपूल इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.येथे एकूण डिलक्स १८ सुट,लेडीज २ डॉरमेटरी सुट,जेन्ट्स डॉरमेटरी १ सूट,१ चेंजींग रूम, १ मॅनेजर रूम, १ वेटींग रूम आहे.

# आमदार बडोलेंची पंचायत समितीला भेट,योजनांचा घेतला आढावा

**अर्जुनी मोर.-**मतदारसंघाचे आमदार व माजी मंत्री ईजी.राजकुमार बडोले यांनी ६ जानेवारीला अर्जुनी मोरगाव पंचायत समितीला अचानक भेट देत अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून शासकीय योजनांचा आढावा घेतला.सोबतच जनतेच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले.



मतदार संघातील काम काजाला सुरवात करीत धार्मीक व पर्यटन विकासाला गती देण्याचे आमदार बडोले यांनी ठरविले असून जनतेची कामे पारदर्शक व्हावे यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.यावेळी पंचायत समिती स्तरावरील घरकुल विभागाचा आढावा घेतला.

तसेच अत्यावश्यक लाभधारकांना प्राधान्यक्रमाने घरकुलाचा लाभ कसा देता येईल या विषयी सुचना केल्या.आपण जनतेच्या सेवेसाठी आहोत.हे ब्रीद लक्षात घेवुन सर्वच विभागातील कामांत पारदर्शकता आणावी असी सुचना गटविकास अधिकारी वैद्य यांना दिली.

यावेळी जि.प.सदस्य लायकराम भेंडारकर, माजी उपसभापती राजेश कठाणे,पं.स.उपसभापती होमराज पुस्तोळे,पं.स.सदस्य नुतनलाल सोनवाने,व्यंकट खोब्रागडे ,खुशाल काशिवार,दिपंकर उके,ईश्वर खोब्रागडे,पं.स.सदस्य घनश्याम धामट व पंचायत समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

### दिल्ली विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं

नवी दिल्ली:-दिल्ली विधानसभा निवडणुकीचे बिगुल अखेर वाजले. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या. त्यानुसार दिल्लीत ५ फेब्रुवारीला मतदान तर ८ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

# १३ लाखाच्या सागवान लाकडाची तस्करी करणाऱ्या तीन आरोपींसह वाहन जप्त

**गोंदिया :-** सडक अर्जुनी वनविभागाच्या पथकाने ०६ जानेवारी रोजी अवैध सागवान लाकडांची तस्करी करणाऱ्या एका टोळीवर कारवाई करीत तब्बल १३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा कोयलारी या परिसरातून नागपूरकडे जात असलेल्या बंद वाहनातून सागवान लाकडांची अवैध रित्या तस्करी होत असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी मिथुन तरोणे यांना गुप्तहेराकडून मिळाली.त्या माहितीच्या आधारे सदर वाहनाचा पाठलाग करून राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ वरील फुटाळा-सौंदड परिसरात अडविले.वाहन चारही बाजूने कुलूप बंद असल्याने त्यात नेमके आहे तरी काय हे कळायला अवघड होते. विशेष म्हणजे वाहन चालकाने वाहन उघडण्यास नकार दिल्याने वन विभगाच्या अधिकाऱ्यांनी सदर वाहन ताब्यात घेत वन विभागाच्या कार्यालयात आणून पंचासमक्ष त्याची तपासणी केली असता लाखो रुपये किमतीचे सागवान लाकूड आढळून आले.त्यामुळे सागवान लाकडाच्या तस्करीकरीता वापरण्यात आलेले महिंद्रा कंपनीचे बोलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच. ४० बी.जी. ३८०१ ज्यावर ओम लॉजिस्टीक लिमिटेड लिहिलेले वाहन जप्त करण्यात आले. त्या वाहनातून १३ नग सागवान लाकूड जे १.९१० घनमिटर एवढे आहे.



त्या लाकडासह वाहनाची अंदाजे किंमत १३ लाख रुपये असून मुद्देमालासह जप्त करुन ४ आरोपी विरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ज्या ४ जणांना त्याब्यात घेण्यात आले,त्यामध्ये जितेंद्र रमेश राऊत, वय ३८ कळमेश्वर,गुणवंत धनराज फ्रुन्ने, वय ४० रा. गुमथळा व अनुज अशोक भोयर, वय २२, रा. परसोडी सर्व राहणार ता. कळमेश्वर जि. नागपूर यांना ताब्यात घेण्यात आले आहे.तर चौथा आरोपी दिनेश भोंडे रा. शेंडा ता. सडक अर्जुनी हा फ्ररार झालेला आहे. आज तिन्ही आरोपींना सडक अर्जुनी येथील न्यायालयासमोर हजर केले असता ३ दिवसाची वन कोठडी आरोपींना ठोठावण्यात आली आहे.फ्ररार आरोपीचा शोध सुरू असून ४ था आरोपी मिळाल्यास सदर लाकडे कुठून आणण्यात आले व अजून किती जणांचा यात समावेश आहे याचा शोध लागणार आहे.



सदर कारवाई सडक अर्जुनीचे वनपरिक्षेत्र अधिकारी मिथुन तरोणे, क्षेत्रसहाय्यक कु.व्ही.बी. रहिले,एस.के. पटले,वनरक्षक कु.व्ही.आर. ब्राम्हणकर, कु. शालु मेंढे, पि.एम. पटले,मुकेश चव्हान, पि.बि.हत्तीमारे, डी.डी. माहूरे, कु.टी.आर.भेलावे, वाहनचालक समीर बंसोड, विपुल शहारे, किशोर बडवाईक यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. पकडलेल्या वाहनातील लाकडे डोंगरगाव डेपो येथे ट्रॅक्टरच्या माध्यमातून हलवण्यात आले.

# डॉक्टर सक्तीच्या रजेवर,चौकशी समिती गठित

## प्रसूतीदरम्यान मातेच्या मृत्यू प्रकरणात प्रशासन गंभीर, भेटी दरम्यान काही कर्मचारी आढळले अनुपस्थित

**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील नवेगावबांध ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीदरम्यान डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका महिलेची प्रकृती बिघडली होती. तब्बल २५ दिवसांच्या उपचारानंतर ३१ डिसेंबर रोजी मेडिकलमध्ये महिलेचा मृत्यू झाला. याप्रकरणी कुटुंबिय आणि संतप्त नागरिकांच्या विरोधानंतर प्रशासनाने या प्रकरणाशी संबंधित डॉक्टरांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. चौकशी समितीही स्थापन केली आहे. तर प्रकारावर प्रशासन सुद्धा गंभीर असून सोमवारी (दि.६) जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी या रुग्णालयाला आकस्मिक भेट देऊन आढावा घेतला.

रागिणी अनिल मसराम यांना प्रसृतीसाठी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिची नॉर्मल प्रसूती झाली. परंतु प्रसूतीनंतर चुकीच्या पद्धतीने टाके लावल्याने या महिलेच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम झाला. नागपुरात दाखल केल्यानंतर टाके लावतांना मुत्र विसर्जन मार्गातील नळी फुटल्याने शरीरात इन्फेक्शन झाल्याने महिलेच्या किडणी आणि मेंदूवर परिणाम झाल्याचे सांगण्यात आले. २५ दिवसांच्या उपचारानंतर ३१ डिसेंबरला महिलेचा मृत्यू झाला. या घटनेने नवेगावबांध ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.



### जिल्हाधिकाऱ्यांची आकस्मिक भेट

**गेल्यावर्षी नोव्हेंबर व डिसेंबर तालुक्यातील तीन गरोदर मातांचा प्रसूतीदरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. कार्यरत डॉक्टर व संपूर्ण कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे या तिन्ही मातांचा मृत्यू झाल्याचा आरोप नागरिकांनी केला. या विरोधात तीव्र आंदोलन सुद्धा केले होते. याची जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी गांभीर्याने दखल घेत सोमवारी (दि.६) आकस्मिक भेट देऊन अर्जुनी मोरगाव व नवेगावबांध येथील ग्रामीण रुग्णालयाची पाहणी करुन कर्मचाऱ्यांना चांगलेच धारेवर धरल्याची माहिती आहे.**

### दोन महिन्यात तीन मातांचा मृत्यू

**तालुक्यातील बीड बुरशी येथील अनिता रवी मेश्राम हिचा २२ नोव्हेंबर रोजी वसंता धनराज नेताम या गर्भवती महिलेचा ४ डिसेंबरला व नवेगावबांध येथील रागिनी अनिल मसराम या गर्भवती महिलेचा ३१ डिसेंबर रोजी डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाला. दोन महिन्यांच्या कालावधीत अर्जुनी मोरगाव तालुक्यात तीन मातांचा मृत्यू झाल्याने तालुकावासीयांमध्ये प्रचंड रोष व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाने सुद्धा याची गांभीर्याने दखल घेत या तिन्ही मातांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी समिती गठित केली आहे. जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी सोमवारी नवेगावबांध व अर्जुनी मोरगाव ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन तेथे दाखल असलेल्या रुग्णांसह संवाद साधून माहिती घेतली. तसेच कर्तव्यावर उपस्थित नसलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी वरुण कुमार शहारे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, ग्रामीण रुग्णालयाच्या डॉ. नंदा गेडाम, डॉ. हरधुले, डॉ. भांडारकर, मधुकर नंदनवार उपस्थित होते.**

### पीडित कुटुंबाला मदतीची मागणी

**या घटनेनंतर संबंधित डॉक्टरला निलंबित करून पीडित कुटुंबाला आर्थिक मदत करण्याची मागणी करीत कुटुंबिय व नागरिकांनी निदर्शने केली. यावेळी तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, उपविभागीय अधिकारी वरुणकुमार सहारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. जायस्वाल, डॉ. मोहबे यांनी आपल्या वरिष्ठांशी चर्चा करुन सदर डॉक्टरांना सक्तीच्या रजेवर पाठवले. चौकशी समिती स्थापन करुन अहवाल आल्यानंतर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.**

## संपादकीय

# नक्षलग्रस्त गडचिरोली विकासाच्या वाटेवर

नव्या वर्षाचा पहिला दिवस. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुर्लक्षित आणि नलक्षग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात विकासकामांचा बुधवारी शुभारंभ केला. गट्टा–गर्देवाडा–वांगेतुरी मार्ग व ताडगुडा पुलाचे लोकार्पण तसेच वांगेतुरी–गर्देवाडा–गट्टा–अहेरी बससेवेचा शुभारंभ, लॉईड मेटल कंपनीच्या विविध विभागांचे भूमिपूजन/उद्घाटन तसेच नवीन हेलिपॅडचे उद्घाटन करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपला जीव धोक्यात घालून नक्षलवाद्यांशी दोन हात करणाऱ्या जवानांशी संवाद साधला. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर गडचिरोलीमधील ११ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यामध्ये आठ महिला व तीन पुरुषांचा समावेश आहे. ते मागील ३८ वर्षांपासून नक्षलवादी कारवायांशी जोडले गेले होते. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांच्या पुनर्वसनासाठी महायुती सरकारकडून १० लाख रुपये रक्कम देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील संपूर्ण माओवाद आता संपुष्टात आणण्याचे काम सुरू झाले आहे. लवकरच दक्षिण गडचिरोली माओवाद्यांपासून मुक्त होईल असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्याचा गाडा चालविला जाणाऱ्या मुंबईतील मंत्रालयात न बसता, नव्या वर्षाचा पहिला जिल्हा दौरा मुख्यमंत्र्यांनी गडचिरोलीसारखा दुर्गम भाग निवडून आपला फोकस कुठे आहे याची राज्यातील जनतेला जाणीव करून दिली आहे.

सर्व घटकांपर्यंत समसमान पद्धतीने विकास पोहोचावा आणि त्यापासून कुणीही वंचित राहू नये यासाठी लहान राज्यांची, लहान जिल्ह्यांची संकल्पना पुढे आली होती.चांदा ते बांदा असा विस्तार असणाऱ्या आपल्या राज्यात याच भूमिकेतून चंद्रपूर अर्थात तत्कालीन चांदा जिल्ह्याचे विभाजन करून २६ ऑगस्ट १९८२ रोजी संपूर्णपणे वनांनी आच्छादित आणि आदिवासीबहुल असणाऱ्या गडचिरोली या नव्या जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली होती. सुमारे ७८ टक्के वनक्षेत्र असणाऱ्या या जिल्ह्यात आदिवासी समाज सर्वाधिक म्हणजेच ३८ टक्के इतका आहे. जिल्हा स्थापनेपासूनच छत्तीसगड सीमावर्ती भागातून शिरकाव करणाऱ्या नक्षल्यांमुळे गडचिरोली जिल्हा होरपळून निघाला होता. उत्तर गडचिरोलीतील कोरची, कुरखेडा, धानोरा या तालुक्यांत एकेकाळी नक्षल्यांची मोठी दहशत होती, परंतु ती मोडीत काढण्यात पोलीस यंत्रणेला यश आले आहे. दक्षिण गडचिरोलीचा परिसर छत्तीसगड व तेलंगणा राज्यांच्या सीमेला जोडून आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेने आता दक्षिण भागाकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. मात्र आता जिल्ह्यातील नक्षल्यांची पीछेहाट होताना दिसत आहे, ही जमेची बाजू आहे.

तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची सूत्रे स्वीकारून महाराष्ट्रातील जनता स्थानिक जनतेबरोबर आहे, असा विश्वास देण्याचा प्रयत्न प्रथम केला होता. कारण २० वर्षांपूर्वी या जिल्ह्यात बदली होऊन गेलेल्या सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांना नेहमीच मृत्यूचे भय वाटत होते. एखाद्याची बदली गडचिरोलीत झाली की, त्याला ती शिक्षा वाटत होती. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारून, जिल्हा नक्षलमुक्त करण्यासाठी प्रयत्न केला होता.

आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जिल्ह्यांकडे विशेष लक्ष दिल्याने, येणाऱ्या काळात गडचिरोली मुख्य प्रवाहात येण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील ११ लाख लोकसंख्येपैकी ६.७० लाख लोक शासकीय योजनेचे लाभार्थी आहेत. सरकार प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. शासन आपल्या दारी योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ट्रॅक्टर, सायकल, हार्वेस्टर देण्यात आली असून, गडचिरोलीमध्ये स्टील प्लांट उभारण्यात येत असून त्यातून ४० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. गडचिरोली शहर हे भारताचे “स्टील सिटी’ होईल, मुंबई–नागपूर समृद्धी द्रुतगती मार्गाने गोंदिया आणि गडचिरोलीला जोडला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना दिली होती. आता देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा गडचिरोलीच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. जिल्ह्यात विकासासाठी संपर्क यंत्रणा विस्तारित करण्याचे मोठे आव्हान असताना, गेल्या चार वर्षांपासून यात भारत संचार निगम लिमिटेडच्या टॉवर उभारणीत सहकार्याचे धोरण प्रशासनाने राबविले. यात १०० टॉवरची उभारणी करण्याचा पहिला टप्पा पार पडला. मुंबईच्या बरोबरीने गडचिरोलीत ४जी सेवा कार्यान्वित झाली आहे. तसेच गडचिरोलीत रेल्वे आणि रस्ते यांचे जाळे उपलब्ध झाल्यानंतर जिल्ह्याची नवी ओळख निर्माण होणार आहे.

जिल्ह्यात साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणावर आहे. येथील वन संपन्नता आणि खनिज संपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात उद्योग आणि त्यातून रोजगार निर्मितीची क्षमता निर्माण होणार आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर दुर्मीळ औषधी वनस्पती उपलब्ध आहे. याचा वापर करून या ठिकाणी “फॉरेस्ट बेस इंडस्ट्री’ अर्थात वनाधारित उद्योग सहज शक्य होणार आहे. तसेच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लोह–खनिज साठे आहेत. या लोह खनिजातून तयार लोहापासून ऑटोमोबाईल उद्योगास जो आवश्यक दर्जा आहे त्या दर्जाचे उत्पादन करणे शक्य होणार आहे. सुरजागड येथे लोह–खनिज प्रकल्प सुरू करण्यास विरोध झाला असला तरी स्थानिकांना यात रोजगार मिळणार याची खात्री पटल्यावर या प्रकल्पाचा मार्ग खुला झाला आहे. गडचिरोली जिल्ह्यात माओवाद संपुष्टात आणण्याचा काम जोमाने सुरू आहे. आता विकासाचे दरवाजेही लवकरात लवकर खुले होतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दी पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## आराखड्यानुसार स्मारकासाठी निधी देणार



**सातारा:–** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची आणखी पाच वर्षांनी द्विशताब्दी साजरी होणार आहे. त्यापूर्वी त्यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करा. त्यासाठी प्रशासनाने १० एकर जमिनीचे तात्काळ अधिग्रहण करावे, असे निर्देश देऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानाला साजेशा भव्य स्मारकासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन व सातारा जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंती निमित्त नायगाव, ता. खंडाळा येथे आयोजित सावित्रीमाई जयंती उत्सवास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, आमदार सर्वश्री छगन भुजबळ, अतुल भोसले, मनोज घोरपडे, सचिन पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले आदी मान्यवर उपस्थित होते.

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दाखवलेल्या सन्मार्गावर चालून शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचे काम करू, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जिवंत स्मारक म्हणजे सक्षम महिला होय. त्यांचा विचार समाजात तळागाळापर्यंत रुजवून स्वयंपूर्ण व स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभारणा?्या महिला घडविण्याचे कार्य शासन करेल. महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्याने पुढील काळात निश्चितपणे महिलाराज येईल. केंद्र शासनाच्या लखपतीदीदींसारख्या योजनेच्या माध्यमातून येणा?्या दोन तीन वर्षात ५० लाख महिलांना लखपती दीदी घडविण्याचे कार्य शासनाने हाती घेतले आहे.

या देशावर, महाराष्ट्रावर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे फार मोठे उपकार आहेत, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्या काळात स्त्रियांना गुलामाप्रमाणे वागणूक मिळत होती त्या काळात समाजातील विषमता दूर करून समतेचे बीजारोपण करण्याचे कार्य फुले दांपत्याने केले. शिव्या शाप, शेण गोळे खावे लागले तरी सावित्रीबाई फुले यांनी न डगमगता स्त्रियांना गुलामीतून बाहेर काढण्यासाठी शिक्षणाची ज्योत पेटवली. या कार्यात महात्मा फुले हे हिमालयाप्रमाणे त्यांच्या सोबत होते. त्यांनी विधवांच्या केशवपन, बालहत्या यासारख्या बाबींना कृतिशील विरोध केला. विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. समाज परिवर्तनाच्या अनेक चळवळींचे नेतृत्व सावित्रीबाई फुले यांनी केले, याची कबुली स्वतः महात्मा फुले यांनी अनेकदा दिलेली आहे. थोर माणसांचे कार्य कधीही संपत नाही, त्यांचे स्मारक उभा करत असताना पुतळ्यासोबतच विचारांचेही स्मारक झाले पाहिजे, असेही मत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी योवळी व्यक्त केले.

यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. स्त्री शिक्षणाची सुरवात झाल्यामुळे आज महिला समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात यशाची शिखरे गाठत आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थान असलेले हे गाव ग्रामविकास मंत्री म्हणून मी दत्तक घेत आहे. यापुढे कामासाठी निवेदने येणार नाहीत, या पध्दतीने नायगावचा विकास केला जाईल. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव प्रेरणास्थान असून त्यांचे विचार उर्जा देणारे आहेत. त्यांच्या सन्मानाला साजेसे स्मारक उभारण्यासाठी दहा एकर जागा शासनाने खरेदी करावी व स्मारकासाठी १२५ कोटी रुपये द्यावेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विकास आराखडा तातडीने मंजूर करावा, अशी मागणी केली. स्मारकाचे काम मंजूर झाल्यानंतर हे स्मारक दोन वर्षाच्या आत उभे राहील. या स्मारकामध्ये महिला सक्षमीकरणासाठी विविध प्रशिक्षणे देण्यात येतील. महिलांना स्वत:च्या पायावर उभे करुन आर्थिक सक्षम केले जाईल, अशी ग्वाहीही श्री. गोरे यांनी दिली.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील म्हणाले, १ जानेवारी १८४८ ला मुलींच्या पहिल्या शाळेची सुरुवात करून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी वर्षानुवर्ष प्रगतीपासून दूर असणाऱ्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यास सुरुवात केली. फुले दांपत्याने समाजाला दिशा दाखवण्याबरोबरच अंधकारातून व अंधश्रध्देतून बाहेर काढले. आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत याचे श्रेय फुले दांपत्याचे आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थळ असलेल्या नायगावच्या विकासासाठी आतापर्यंत जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले आहेत, यापुढेही ते अखंड सुरू राहतील. नायगाव हे आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र व्हावे यासाठी प्रयत्न केले जातील.

आमदार छगन भुजबळ यांनी फुले दांपत्याचा विरोध हा ब्राह्मण्यवादाला होता, कोणत्या जातीपातीला नव्हता असे सांगून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा उल्लेख केला. त्यांच्या जीवनातील महत्त्वाची ठिकाणे जोडण्याचे काम मार्गी त्वरित लावावे, तसेच सावित्रीबाई फुले यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार हा ३ जानेवारी रोजी नायगाव येथील कार्यक्रमातच दिला जावा, फुले दांपत्याच्या साहित्याचे पुनर्मुद्रण व्हावे अशी मागणीही त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळी यांच्या असलेल्या स्मारकास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यांनतर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शिल्पसृष्टीचीही पाहणी केली. या ठिकाणी स्मारक उभारणी आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमात विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये ब वर्ग पर्यटन क्षेत्रांतर्गत उभारण्यात आलेल्या शासकीय प्रतिक्षालयाचे उद्घाटन, जलजीवन मिशन अंतर्गत वॉटर एटीएमचे उद्घाटन, महाज्योतीच्या विविध योजनांच्या प्रदर्शन दालनांचे उद्घाटन, महिला बचतगटांच्या उत्पादित वस्तूंच्या विक्री स्टॉल्सचे उद्घाटन, जिल्हा परिषद शाळेतील निबंध चित्रकला व वकृत्त्व, स्पर्धेतील विजेते, विद्यार्थी यांच्या बक्षिस वितरण, यशस्वी महिलांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार मदन भोसले, सरपंच स्वाती जमदाडे, गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे, नितीन घुले यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला, अधिकारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांनो पुरोगामी विचारवंत व्हा–प्रा.गायधनी

## *गोंदियात सावित्रीमाईची जयंती थाटात*रमाई माऊली नाटिकेने प्रेक्षक मंत्रमुग्ध

**गोंदिया:–**१९ व्या शतकात एका अविद्येने आमचं अनर्थ केलं. याची जाणीव ठेवून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला शिक्षणाचा दर्जा संविधानातून मिळवून दिला, तेव्हा महिला भगिनींनो आतातरी पुरोगामी विचारवंत व्हा असे कडकडीचे आवाहन नागपूरच्या फुले शाहू आंबेडकरी विचारवंत प्रा. माधुरी गायधनी (दुपटे ) यांनी केलं. येथील नवीन प्रशासकीय इमारती समोर आयोजित क्रांतीज्योती सावित्रीमायी फुले यांच्या १९४ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या अध्यक्ष पदावरून बोलत होत्या. मंचावर कार्यक्रमाच्या उदघाटक शुभांगी घाटोळे, मुख्य वक्ता स्मिता गोविंद पानसरे आणि मुंबईच्या पोलीस निरीक्षक ममता नंदागवळी उपस्थित होत्या.




पुढे बोलताना प्रा. गायधनी म्हणाल्या की आम्ही शिकलो, इंजिनिअर, डॉक्टर, कलेक्टर झालो, आमचं शिकणे, नटणे हे सर्व माता सवित्रिमूळे मिळालं परंतु आज ३ जानेवारी क्रांतीज्योतीच्या जयंतीची आंबेडकरी महिलांशिवाय इतर महिलांना काहीही माहिती नाही यावर त्यांनी चिंता व्यक्त केली.

महिलांची भूमिका विशद करताना प्रा. गायधनी म्हणाल्या माता जिजाऊने शिवाजी महाराजांना छत्रपती केलं परंतु आताच्या काळात समाजाचं वातावरण बिघडलं आहे, हाथरस सारख्या घटना घडत आहेत. मुलींनी स्वतःच्या पायावर उभं झालं पाहिजे कारण आई शिकली तर कुटुंब शिकतं, समाज शिकतो आणि देश संस्कारीत होतं. मेंदू सुदृढ असलं तर पुरोगामी विचार रुजतील यामुळे आपला समाज आणि देश पुरोगामी होईल. ज्या भिडेवाड्यातून शिक्षणाची दारं उघडली त्या भिडेवाड्याची दारुण स्थिती आहे. आमच्या हक्काच्या शाळा बंद पडत आहेत. आम्ही सावित्री भीमाच्या लेकी आहोत, सामाजिक जीवनाची जाण ठेवून महिलांच्या शिक्षणाचा सन्मान करा, पोरी जरा जपून, हेच नाहीतर, पोरा जरा जपून हेही विचार समाजात रुजविण्याची गरज आहे असा सल्ला त्यांनी दिला. या प्रसंगी बोलताना श्रीमती पानसरे यांनी चार्वाक यांच्या पत्नीचे उदाहरण स्पष्ट करून,बहुमत हे निर्णायक असतं असं नाही यावर त्यांनी युक्तिवाद केला.

याप्रसंगी उदघाटक श्रीमती घाटोळे आणि पोलीस निरीक्षक नंदागवळी यांनीही विचार मांडले. याप्रसंगी संथागार महिला विंगच्या महिलांनी सादर केलेली सूर्याची सावली – रमाई माऊली ही नाटिका पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समन्वयक पदाधिकाऱ्यांचे स्मृतिचिन्ह व पुष्पगुछ देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हा कार्यक्रम क्रांतीज्योती सवित्रीमाई फुले फॉलोअर्स महिला संघटनाच्या वतीने आयोजित केला.माता सवित्रीआई फुल्यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक समता गणवीर यांनी, संचालन सविता उके यांनी तर आभार श्रीमती फुले यांनी मानले.

# धोटे बंधु विज्ञान महाविद्यालयातील ३ संशोधन प्रकल्पाची राज्यस्तावर निवड

गोंदिया : शिक्षण संस्था, गोंदिया द्वारा संचालित घोटे बंधु विज्ञान महाविद्यालय, गोंदिया च्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठस्तरावर आयोजित अविष्कार २०२४–२५ स्पर्धेत संस्थेचे सचिव राजेन्द्र जैन, संचालक निखिल जैन, प्राचार्य डॉ. अंजन नायडू, डॉ. जे. जी. महाखोडे याच्या प्रेरणेमुळे सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके पटकावून महाविद्यालयाचे नाव उज्जवल केले.

ही स्पर्धा विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण संकल्पनांचे सदरीकरण करणारे एक महत्वपूर्ण व्यासपीठ आहे. विज्ञान श्रेणी (पीपीजी स्तर) राजकुमार मुलचंद पटले, शेती आणि पशुपालन श्रेणी (युजी स्तर) चहक भुवनेश्वर पारधी व इंजिनिअरिंग आणि तंत्र ज्ञान श्रेणी (युजी स्तर) कल्याणी चिंघालोरे याच्या संशोधन प्रकल्पाची विद्यापीठ स्तरावर निवड करण्यात आली असुन आता ते राज्यस्तरीय अविष्कार संशोधन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगढ येथे १२ ते १५ जानेवारी भाग घेणारे आहेत.

सर्व संशोधन प्रकल्पांना डॉ. दिलिप चौधरी (प्राध्यापक भौतिक शास्त्र), डॉ. मनोज पटले (प्राध्यापक रसायन शास्त्र) आणि प्रा. मनिष बावनकर यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजन नायडू यांनी विजेत्यासह मार्गदर्शकाचे अभिनंदन केले.



# सावित्रीआई फुलेंच्या जयंतीनिमित्त टेमनी येथे निशुल्क ट्युशन वर्गाचे उद्घाटन



**गोंदिया:–** तालुक्यातील टेमनी येथे क्रांतीज्योती सावित्रीआई फूले यांच्या जयंती निमित्य फूले शाहू बिरसा मुंडा आंबेडकर विचार मंच टेमनी व बहुजन हिताय बहुउद्देशीय विकास संस्था टेमनी द्वारे गरजू मुला मुलीकरींता सावित्रीआई फूले सक्सेस निशुल्क ट्यूशन क्लासेसची सुरुवात करण्यात आली.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नरेश परिहार,फूले शाहू बिरसा मुंडा आंबेडकर विचार मंच टेमनीचे अध्यक्ष राजेश डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच रवींद्र बिसेन, रोजगार सेवक दुर्योधन वंजारी,सामाजिक कार्यकर्तो राजू टेकाम, ईशाताई वाघाडे(शिक्षिका),ममता मेश्राम ,जयदेव डोंगरे, महेश नागपुरे, लोकेश सर्राटे, सुरेन्द्र पारधी, कमलेश बन्सोड,सुनील बन्सोड,मंजीत बन्सोड प्रमुख्याने उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# “दर्पणकार’ आचार्य बाळशास्त्री जांभेकर



सध्या बातमीदारी किंवा पत्रकारीता ही एका क्लिकवर आली आहे. त्यामध्ये सोशल मीडियामुळे तर क्रांतीच झाली आहे. त्यानंतर आतातर सिटीझन जर्नालिस्ट हा प्रकार अस्तित्वात आला आहे. मात्र माध्यमे प्रिंट, इलेक्ट्रॉनिक त्यानंतर सोशल मीडिया या तिनही माध्यमातून जातांना अधिक वेगवान झाली आहेत. मराठीमध्ये माध्यमांच्या स्थित्यंतराचा अभ्यास करतांना बाळशास्त्री जांभेकर यांना विसरून चालणार नाही. त्यांच्या व्यक्तीमत्वाचा वेध घेणारा हा लेख...

मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र “दर्पण’ हे बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केले. या दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा होतो. बाळशास्त्री हे इंग्रजी राजवटीतील एक विद्वान व्यक्तिमत्व म्हणून प्रख्यात होते. बालपणी घरीच मराठी व संस्कृत भाषांचा अभ्यास केलेल्या बाळशास्त्रींनी सन १८२५ मध्ये मुंबई येथे सदाशिवबापू छत्रे आणि बापूशास्त्री शुक्ल यांच्याकडून संस्कृत आणि इंग्रजीचे शिक्षण घेतले. गणित आणि आधुनिक विज्ञान या विषयातही ते पारंगत होते. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी सन १८३४ मध्ये एल्फिन्स्टन महाविद्यालयात पहिले भारतीय व्याख्याते म्हणून जांभेकरांची नियुक्ती झाली.

बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या भाषांचे ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील नैपुण्याबद्दल फ्रान्सच्या राजाकडून त्यांचा मानसन्मान झाला. त्यांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांचे शोधनिबंध लिहिले. मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम उपलब्ध करून दिली. कुलाबा वेधशाळेच्या संचालकपदीही त्यांची नियुक्ती करण्यात आली. रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र अशा विविध विषयांचे बाळशास्त्री यांना ज्ञान होते.

एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये अध्यापन करीत असताना समाजाकडे सजगतेने पाहणाऱ्या बाळशास्त्रींना अनेक समस्या दिसून येत. पारतंत्र्य, अनिष्ट रूढी, चालीरीती, अज्ञान, दारिद्र्य, अंध:श्रद्धा होणाऱ्या समाजाच्या अधोगतीमुळे त्यांना चिंता वाटत असे. या सर्व समस्यांमधून मार्ग दाखविण्यासाठी प्रबोधनाची आवश्यकता त्यांना जाणवली. त्यासाठी गोविंद कुंटे आणि भाऊ महाजन यांच्या मदतीने त्यांनी “दर्पण’ हे मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले.

६ जानेवारी १८३२ रोजी “दर्पण’चा पहिला अंक प्रकाशित झाला. जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने “दर्पण’ आवर्जून मराठी भाषेत काढण्यात आले. त्याचवेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी “दर्पण’मध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. वृत्तपत्राची संकल्पना त्या काळी सर्वसामान्यांमध्ये रुजलेली नसल्याने “दर्पण’ला सुरुवातीला मोठ्या संख्येने वर्गणीदार मिळाले नाहीत. मात्र ही संकल्पना जशी रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. “दर्पण’ साडे आठ वर्षे चालले आणि जुलै १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला.

तत्कालीन पश्चिम बंगालमध्ये पहिले वृत्तपत्र सुरु झाले. मराठीत बाळशास्त्री जांभेकरांनी पुढाकार घेतला, त्यांच्या नावाने आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना सुरु झाली. त्या योजनेची थोडक्यात माहिती... पत्रकारांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी या योजनेच्या विश्वस्त मंडळामार्फत ज्येष्ठ पत्रकारांसाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर संस्थेच्या विश्वस्त मंडळाने शिफारस केल्यानुसार या योजनेच्या लाभार्थ्यांच्या पात्रतेसाठीचे निकष खालील प्रमाणे आहेत.

वृत्तपत्र आणि इतर वृत्तप्रसार माध्यम संस्था यांचे संपादक, ३० वर्षे पत्रकार म्हणून काम केलेले व वय वर्षे ६० पूर्ण झालेले जेष्ठ पत्रकार. किमान सलग ३० वर्षे श्रमिक पत्रकार/ छायाचित्रकार म्हणून सेवा करुन सेवानिवृत्त झालेले व किमान ६० वर्षे वय पूर्ण झालेले पत्रकार/ छायाचित्रकार. किमान सलग ३० वर्षे स्वतंत्र व्यवसायी पत्रकार/ छायाचित्रकार म्हणून पत्रकारिता/ छायाचित्रकार म्हणून पत्रकारिता करुन निवृत्त झालेले व किमान ६० वर्षे पूर्ण झालेले स्वतंत्र व्यवसायी पत्रकार, छायाचित्रकार. किमान सलग १० वर्षे अधिस्वीकृतीधारक असलेले पत्रकार व वयाची ६० वर्षे पूर्ण झालेला असावा.

अधिस्वीकृतीधारक नसलेल्या पत्रकारांच्या बाबतीत अधिस्वीकृती पत्रिकेसाठी असलेले निकष पूर्ण करीत असलेले पत्रकार यांचा सदर योजनेसाठी विचार करण्यात येईल. याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार समितीला असेल. ज्या पत्रकारांना इपीएफ योजना (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी) व्यतिरीक्त इतर कोणत्याही स्त्रोतातून निवृत्ती वेतन किंवा निवृत्ती वेतनविषयक लाभ मिळालेले/मिळत नसेल अशा पत्रकारांसाठीच ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना लागु राहील. ज्येष्ठ पत्रकार म्हणजे ज्याची उपजिविका केवळ पत्रकारितेवर अवलंबून आहे आणि अन्य कोणत्याही नोकरी/व्यवसाय यामध्ये नाही/ नव्हते असे जेष्ठ पत्रकार. गंभीर गुन्ह्यामध्ये दोषसिध्दी होवून शिक्षा झालेली आहे अशा पत्रकारांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नसेल.

सदर योजनेसाठी ज्येष्ठ पत्रकार ज्या प्रसार माध्यमामध्ये पत्रकारिता करुन निवृत्त झाले त्या प्रसार माध्यमातील संबंधित वृत्तपत्र नियमीत असावे. वृत्तवाहिनी असल्यास ती अधिकृत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे नोंदणीकृत असावी. या योजनेसाठी लाभ घेऊ इच्छिणारा पत्रकार आयकर भरणारा नसावा. सदर सन्मान योजने अंतर्गत आर्थिक मदतीची रक्कम लाभार्थी हयात असेपर्यंत मिळेल. लाभार्थी पत्रकाराच्या मृत्यूपश्चात सदर सन्मान योजनेचा लाभ त्याच्या कुंटुबियास देय असणार नाही असे या योजनेचे स्वरुप आहे.

**कैलाश गजभिये,**
उपसंपादक,
जिल्हा माहिती कार्यालय,गोंदिया

# तंबाखुच्या दुष्परिणामाची प्रत्येकाला जाणीव असावी-भैय्यासाहेब बेहेरे



**गोंदिया :-** तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे दरवर्षी अनेक लोकांचा मृत्यू होतो. ही बाब माहिती असतांना सुद्धा अशा पदार्थांचे सेवन मोठ्या प्रमाणात होतांना दिसत आहे. आरोग्याच्या दृष्टीने ही बाब घातक असल्यामुळे सुखकर जीवन जगण्यासाठी तंबाखुच्या दुष्परिणामाची प्रत्येकाला जाणीव असावी, असे मत निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हा समन्वय समिती व सनियंत्रण समितीची सभा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

सभेला अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.तृप्ती कटरे, जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ.अनिल आटे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त संजय शिंदे, पोलीस निरीक्षक दिनेश लबडे, शिक्षण विस्तार अधिकारी लक्ष्मण चव्हाण, दंत शल्यचिकित्सक डॉ.अमोल राठोड, जिल्हा सल्लागार (एनटीसीपी) डॉ.ज्योती राठोड, राज्यकर अधिकारी नरेश मडावी, मनोवैज्ञानिक सुरेखा आझाद मेश्राम, सामाजिक कार्यकर्त्या संध्या शंभरकर, आकृती थींक टूडे स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष प्रमोद गुडधे व समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.

कोटपा कायदा २००३ अंतर्गत तंबाखुजन्य अभियान राबविण्याबाबत शासनाच्या सूचना आहेत. त्यानुसार शाळा-महाविद्यालयांपासून १०० मीटर परिसरात आढळणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थ विक्री दुकानदारांवर कोटपा कायदा २००३ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस व आरोग्य विभागाला दिले.

आजची तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे. आजही अनेक नागरिक गुटखा, खर्रा, तंबाखू, पानमसाला इत्यादीचे सेवन करीत असल्याने अशा प्रकारच्या वस्तुंवर बंदी घालण्यात आली असली तरी देखील सेवन केले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपापल्या परीने तंबाखूच्या दुष्परिणाबाबत लोकांचे समुपदेशन करुन व्यवनाधीनतेपासून परावृत्त केले तर मोठ्या प्रमाणात जनजागृती होवून मौखिक आजारांचे प्रमाण कमी होऊ शकते, असे निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

कोटपा कायदा २००३ अंतर्गत कलम ४ नुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास बंदी, कलम ५ नुसार तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिरातीवर बंदी, कलम ६ (अ) नुसार अल्पवयीन व्यक्तीस तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणे हा दंडनीय गुन्हा व कलम ६ (ब) नुसार शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्री करण्यास बंदी तसेच कलम ७ नुसार तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या वेस्टनवर धोक्याची सूचना देणे बंधनकारक आहे. यापुढे सार्वजनिक ठिकाणी जसे-दवाखाना, शाळा, महाविद्यालये, बस स्थानक, शासकीय-अशासकीय कार्यालये इत्यादी तसेच शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री करतांना आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

प्रास्ताविक जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ.अनिल आटे यांनी केले. गोंदिया जिल्ह्यात केटीएस गोंदिया, तिरोडा, सडक अर्जुनी, मोरगाव अर्जुनी, नवेगावबांध, गोरेगाव व सालेकसा असे एकूण ७ तंबाखूमुक्ती समुपदेशन केंद्र आहेत. राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम मार्फत कोटपा कायदा २००३ अंतर्गत माहे जानेवारी ते डिसेंबर २०२४ पर्यंत एकूण १४५ लोकांवर दंडात्मक कार्यवाही करुन २१ हजार ५८० रुपये वसूल करण्यात आले असून चलानद्वारे शासन जमा करण्यात आले आहे, असे त्यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

# जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



**गोंदिया :-** पत्रकार दिनानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयातफ दर्पणकारफ आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटूडे व माध्यम प्रतिनिधींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे माहिती व शिक्षण तज्ज्ञ अतुल गजभिये, उपसंपादक कैलाश गजभिये, वरिष्ठ लिपीक धम्मदिप बोरकर व तुषार उरकांदे, युवा कार्य प्रशिक्षणार्थी संदिप पटले, शिपाई संतोष राऊत तसेच माध्यम प्रतिनिधींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटूडे यांनी जिल्हा माहिती कार्यालयामार्फत माध्यम प्रतिनिधींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती विशद करून सदर योजनांचा माध्यम प्रतिनिधींनी लाभ घेण्याचे आवाहन केले व आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या कार्याची महती विशद केली.

अतूल गजभिये यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकून आचार्य जांभेकरांच्या कार्याविषयी सविस्तर माहिती विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपसंपादक कैलाश गजभिये यांनी केले, तर उपस्थितांचे आभार वरिष्ठ लिपिक धम्मदीप बोरकर यांनी मानले.

# राष्ट्रवादी काँग्रेस एकोडी क्षेत्राच्यावतीने आ.रहांगडाले व माजी आ.जैन यांचा सत्कार



**गोंदियाः-** विधानसभा २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या नेतृत्वात तिरोडा विधानसभा क्षेत्रात महायुतीने प्रचंड बहूमताने यश प्राप्त केला. त्याअनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकोडी जिल्हा परिषद क्षेत्राच्या वतीने राजेश कटरे यांच्या निवास स्थानी पार पडलेल्या कार्यक्रमात निवडणुकीतील विजयाचे शिल्पकार माजी आमदार राजेंद्र जैन व नवनिर्वाचित आमदार विजय रहांगडाले यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

सत्कारमूर्ती माजी आमदार राजेंद्र जैन म्हणाले की, शेतकऱ्यांना बोनस, लाडकी बहीण योजना, मुलींना निःशुल्क उच्च शिक्षण, मोफत तीन सिलेंडर योजना, बळीराजा मोफत वीज योजना, यासारख्या विविध योजनांच्या माध्यमातून सरकारने प्रगतीची व उन्नतीची कामे केल्याने जनतेने महायुतीला पुन्हा जन आशीर्वाद दिला आहे. जनतेने खा. प्रफुल पटेलजी व महायुती सरकारवर दाखविलेला विश्वास कायम ठेवून विकासाची व प्रगतीचे कार्य करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी राजेंद्र जैन, विजय रहांगडाले, विनोद हरीणखेडे, प्रिया हरिणखेडे, राजेश कटरे, अश्विनी रविकुमार पटले, डॉ. बसंत भगत, डॉ. किशोर पारधी, प्रकाश पटले, रविकुमार पटले, द्वारका साठवणे, संगीता पताहे, हिरामण मसराम, कृष्णकुमार पटले, हितेश पताहे, संतोष रीनायत, मीनाक्षी कटरे, सेविका आगाशे, शुभम बोदेले, लक्ष्मी उपवंशी, शांतनू पारधी, तिजेश पटले, रामु पंधरे, सुरेश बिरणवार, प्रल्हाद कुसरा, आशा बाळने, पूजा कोडापे, विद्यकला सोनवाणे, दुर्गा तुमसरे, पप्पू पटले, बेला उईके, खुमेश तुरकर, राजेश पाटील, हिरालाल मोहारे, गोविंद लीचडे, रघुवीर उईके, रंजीत टेंभरे, संजय बावनकर, विश्वास रहांगडाले, सदाराम बावनकर, धर्मेंद्र कनोजे, मेगनाथ शरणागत, राजेश सरोदे, देवलाल टेंभरे, लंकेश पटले, मोनु शेख, लोकेश नागभिरे, जितेश सोलंकी, मोनिष बावनकर, रविंद्र किसाने, धर्मसिंह टेकाम, छगन दियारी, रफ्फिक पठाण, राजकुमार टालटे, मंगल जगणीत, हंसराज मदनकर, तुरणकर भदाडे, हरिकिशन नागपुरे, विनोद मेश्राम, नीलम कांबळे, चमन मदनकर, राजेंद्र सोनवाने, प्रकाश घासले, डिगंबर नरवास, जितेंद्र नागपुरे, दिलीप बावनकर, जितेंद्र दखने, मधुकर ठकरेले, साहिल पठाण, दुर्गेश नागपुरे, छाया बावनकर, कविता मोहरे, भावना हरिणखेडे, तारा हरिणखेडे, वंदनाताई डोंगरे, अरुणा बावनकर, अनिता हरीणखेडे, शितल हरीणखेडे, संगीता चौधरी, दीपा बावनकर, तीजा सोनेवाणे, मंजु राऊत, चंद्रप्रभा पटले, ललिता चौधरी, आशा गोटे, सावंत सुलाखे, खेमलाल पताहे, नामदेव मेश्राम, दुर्गेश खरोले, प्रकाश भलावी, विजय पटले, सुरेश बाळने, राजेश बिसेन, रवींद्र सोनवाने, संजय चौधरी, फागुलाल चौधरी, बसंत नागपुरे, ज्योती नागभीरे, दीपा चौरागडे, स्वाती वाहणे सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी स्नेह सम्मेलन आवश्यक-विनोद अग्रवाल



**गोंदिया:-** स्थानिक एक्युट पब्लिक स्कूल गोंदिया येथे २९ डिसेंबर रोजी १९ वे वार्षिक स्नेह सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात उद्घाटक म्हणून आमदार विनोद अग्रवाल उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. समाज कल्याण सभापती पूजा अखिलेश सेठ, कटंगीच्या सरपंच मोहीनी वराडे, पं.स.सदस्य विनोद बिसेन, पं.स.सदस्य राहूल मेश्राम उपस्थित होते.

सर्वप्रथम माँ सरस्वती, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच स्व.के.डी.भास्कर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन पूजन करण्यात आले. नवनिर्वाचित आमदार विनोद अग्रवाल यांचे शाल, श्रीफळ आणि शिवाजी महाराजांचे स्मृतीचिन्ह देऊन सम्मान करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे गरजेचे आहे.

कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच वार्षिक स्नेहमंमेलन अत्यंत आवश्यक आहे कारण यामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना प्रदर्शित करण्यासाठी वाव मिळतो.

कार्यक्रमाला संस्थेच्या अध्यक्ष गिता भास्कर, उपाध्यक्ष प्रियेश सहारे, सचिव संजय भास्कर, सहसचिव शुभा सहारे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नंदा मॅडम, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांनी अथक मेहनत घेवून कार्यक्रम यशस्वी केले. एकता मॅडम यांनी सर्व पाहुणे पालक व विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त केले.

# ३६ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाचा गोंदिया शुभारंभ




**गोंदियाः-** गोंदिया उपप्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने ३६ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे उदघाटन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयात पार पडले. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नागेश भास्कर, पोलिस निरीक्षक (जिल्हा वाहतूक शाखा गोंदिया) हे उपस्थित होते.

मोटर वाहन निरिक्षक ओम प्रकाश सयाम यांनी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियांतर्गत घेण्यात येणारे विविध उपक्रमाबद्दल सर्वांना माहिती दिली.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसकर यांनी लोकांना टू व्हीलर चालवताना हेल्मेट व फ़ोर व्हीलर चालविताना सीट बेल्टचा वापर करण्याचे आवाहन केले.सदर कार्यक्रमाचे सूत्र संचलन अमीत रौंदळ यांनी केले,तर प्रास्ताविक पंकज आनंदपुरे यांनी केले.कार्यक्रमाचे समारोपीय आभार प्रसाद सुर्वासे यांनी मानले.

## एचएमपीव्ही विषाणूला घाबरू नका,मात्र काळजी घ्या- जिल्हाधिकारी नायर

### -जिल्हा आरोग्य विभाग सतर्क

### -चिंतेचे कारण नाही, हस्तांदोलन करु नका

**गोंदिया,:** कोरोना सारखे लक्षण असलेल्या विषाणुने कोरोनाची आठवण ताजी केलेली आहे. सद्यस्थितित एचएमपीव्हीचे भारतामध्ये ४ रुग्ण आढळून आले असले तरी सदर आजाराबाबत कोरोनासारखी घाबरण्याची गरज नाही. कारण हा विषाणू नवीन नसून जुनाच आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत एचएमपीव्हीचा एकही रुग्ण आढळलेला नाही. या विषाणूविषयी चिंतेचे कारण नसल्याचे आरोग्य तज्ञांकडून सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाता कामा नये, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर व जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी केले आहे.

खबरदारी म्हणून सर्दी, खोकला आणि फुप्फुसाच्या गंभीर संसर्गाच्या रुग्णांचे नियमीत सर्वेक्षण सुरु करण्यात आलेले आहे. या विषाणूचा संसर्ग प्रामुख्याने लहान मुले व वयोवृध्द व्यक्तींना (मधूमेह व उच्चरक्तदाब) होण्याची शक्यता जास्त असते. या आजाराला काही प्रतिबंधात्मक उपाय करून सुध्दा रुग्ण बरे होऊ शकतात. त्याबद्दल सार्वजनीक आरोग्य विभागाकडून नागरीकांना खालील प्रतिबंधात्मक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**असे करू नये-**

✻ हस्तांदोलन✻ टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर ✻ आजारी लोकांशी जवळचा संपर्क ✻ डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे.✻ सार्वजनिक ठिकाणी थुंकणे✻ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी, गोंदिया यांनी नागरीकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे व मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केलेले आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय बोरी पंचायत समिती अर्जुनी/मोर. जि.गोंदिया

दिनांक:-०७/०१/२०२५

### निविदा सूचना क्र-१ (पहिली वेळ) सन २०२४-२५

ग्रा.पं.कार्यालय बोरी पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे स्वच्छ भारत मिसन व १५ वा वित्त आयोग व इतर योजनेच्या सन २०२४-२५ चे निधीतून जि.प.शाळा आसोली येथे सार्वजनिक शौचालय बांधकाम व इतर बांधकाम करणे या कामाकरिता लागणारे साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहोचते दरानी GST धारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांचे कडून मोहरबंद द्वि लिफाफा पद्धतीने साहित्य खरेदीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेची विस्तृत जाहीरात ग्रा.पं.कार्यालय बोरी सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असून निविदितील अटी व शर्तीनुसार इच्छुक GST धारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांनी साहित्य खरेदीच्या निविदा सादर कराव्या. निविदासोबत १०००/-रु. व कोरे निविदा फी सोबत ५००/- ने भरुन ग्रा.पं.बोरीच्या नावे द्यावा लागेल. उपरोक्त फी भरल्याशिवाय निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्ध | दि.०८/०१/२०२५ |
| २ | कोरे निविदा प्रपत्र रु.फी ५००/- ने भरुन ग्रा.पं. कार्यालयातून प्राप्त करणे. | दि.०८/०१/२०२५ ते १५/०१/२०२५ सायं.१.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत |
| ३ | निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | ०८/०१/२०२५ |
| ४ | निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | १५/०१/२०२५ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ५ | निविदा उघडण्याचा शक्यतो दिनांक | १६/०१/२०२५ किंवा पुढील होणाऱ्या मासिक सभेत शक्य झाल्यास |

**सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय बोरी**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय बोरी**



## ग्रामपंचायत कार्यालय बोरी पंचायत समिती अर्जुनी/मोर. जाहिर निविदा सुचना (पहिली वेळ)

दिनांक:-०७/०१/२०२५

ग्रामपंचायत कार्यालय बोरी पंचायत समिती-अर्जुनी/मोरगाव जिल्हा परिषद-गोंदिया अंतर्गत १५ वा वित्त आयोग अंतर्गत कामे (सन २०२०-२०२१,२०२१-२०२२) अंतर्गत खालील विवरण पत्रामधील पूर्ण बांधकामाची निविदा महाराष्ट्र शासन तरतुदीच्या अधीन राहून यथायोग्य पंजीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पद्धतीने कामे करणेकरिता मोहरबंद दोन लिफाफा पद्धतीने अनुसूची ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजित किंमत | नमुना ७ निविदा फार्म ची किंमत | निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम १% | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजा बोरी येथे नळ योजना दुरुस्ती व वाढीव पाईप लाईन व पाणी टाकी रंगरंगोटी करणे | १७२८२९/- | | १७२८/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| २ | मौजा बोरी येथे नळ योजना दुरुस्ती वॉल चेंबर तयार करणे पाणी टाकीला तारेचा कंपुल व गेट बसविणे | २८९३१०/- | १०००/- | २८९३/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |


| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | ०८/०१/२०२५ |
| २ | निविदा विक्री व स्वीकृती चा अंतिम दिनांक | ०८/०१/२०२५ ते १५/०१/२०२५ |
| ३ | निविदा उघडण्याचा दिनांक | १६/०१/२०२५ वेळ ०१.०० शक्य झाल्यास |

**(सदर निविदेची विस्तृत माहिती व अटी शर्ती ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर बघायला मिळेल.)**

**सरपंच**
**ग्रामपंचायत बोरी**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत बोरी**





साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.०८ जानेवारी २०२५ ४

# २०० जीर्ण वर्गखोल्यांतून हजारो विद्यार्थ्यांचे जीवन मुठीत घेऊन ज्ञानार्जन



**गोंदिया:–** जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १ हजार ६४४ शाळा असून लाखो विद्यार्थी शिक्षण घेतात. परंतु जिल्ह्यातील २०० वर्गखोल्या जीर्ण झाल्या आहेत. मात्र या जीर्ण झालेल्या वर्गखोल्यांमधून हजारो विद्यार्थी जीव मुठीत घेऊन शिक्षण घेत असल्याची बाब पुढे आली आहे.

दोन दिवसांपुर्वीच गोरेगाव तालुक्यातील साईटोला येथील जि.प. शाळेच्या जीर्ण झालेल्या इमारतीच्या स्लॅबचे प्लास्टर कोसळल्याने तीन विद्यार्थी जखमी झाले. या घटनेमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. धोकादायक शाळेत शिकायला मुलांना पाठविणे आई–वडीलांना धोक्याचे वाटत आहे. शाळा आणि वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीमधून मागणी करण्यात आ–लेली आहे. या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट जिल्हा परिषदेकडून केले जात नसून फक्त शाळा धोकादायक असल्यास याबाबत अहवाल दिला जातो. जिल्हा नियोजन समितीमध्ये यासाठी निधीची मागणी केली जाते

## १० कोटी मिळाले, २० कोटी कधी देणार, जिल्हावासीयांचा सवाल

### १० कोटींतून डागडुजी की नवीन बांधकाम

एका वर्गखोलीची डागडुजी (रिपेअरिंग) केले तर ५ लाख रुपये लागतात आणि नविन वर्गखोली बांधली तर १५ लाखाची गरज असते. जिल्हा नियोजनमधून मिळालेल्या दहा कोटींतून फक्त रिपअरिंग केले तर २०० वर्गखोल्यांची डागडुजी होईल. परंतु नवीन वर्गखोली केली तर ६४ वर्गखोल्या नवीन बांधल्या जातील. आता शिक्षण विभाग संपूर्ण डागडुजी की नवीन इमारत बांधकाम करते हे वेळ ठरवेल.

### २५ वर्षांपासून इमारतीवर एक रुपयाही खर्च नाही

सन २००० मध्ये बांधण्यात आलेल्या वर्गखोल्यांवर आतापर्यंत एक रुपयाही खर्च करण्यात आला नाही. त्यामुळे वादळ, पाऊस, उन्ह ह्या तिन्ही ऋतूच्या झळा सोसणाऱ्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. दर १० वर्षांनी शाळांच्या इमारतीची डागडुजी करणे आवश्यक आहे.

### जिल्ह्यातील २०० वर्गखोल्यांची त्वरित दुरुस्तीची गरज

जिल्ह्यातील २०० वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीसाठी ३० कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे. यंदा या वर्गखोल्यांसाठी १० कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे. उर्वरित निधीची प्रतीक्षा आहे.

गोंदिया जिल्ह्यातील जीर्ण वर्गखोल्यांसाठी १० कोटी रुपये मिळाले आहेत. त्यातून नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम केले जाणार आहे. वर्गखोल्यांच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन नवीन वर्गखोल्या बांधल्या जाणार आहेत.

सुधीर महामुनी, शिक्षणाधिकारी, गोंदिया

### निधी कधी मिळेल?

जिल्हा नियोजन समितीमध्ये यासाठी निधीची मागणी करण्यात आली असून पालकमंत्र्यांच्या आदेशाने हा निधी उपलब्ध केला जातो. जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील २०० वर्गखोल्यांसाठी १० कोटी मिळालेत. उर्वरित निधी कधी मिळेल, असा जिल्हावासीयांचा सवाल आहे.

### दुरुस्तीसाठी २० कोटींची गरज

शाळा आणि वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी एकूण ३० कोटींची गरज होती. मागील वर्षी जिल्हा नियोजन समितीमधून दुरुस्तीसाठी १० कोटी रुपये निधी उपलब्ध झाला आहे. आणखी २० कोटींची गरज आहे.

मात्र निधी अल्प प्रमाणात मिळतो. ३० कोटीची गरज असताना १० कोटी मिळाले आहेत.

# २०२९ ची लोकसभा निवडणुक मी स्वत:लढणार-खा.प्रफुल पटेल

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका बहुतांश स्वबळावर व मैत्रीपुर्ण लढतीत होणार



**गोंदिया:–** राज्यातील महायुती सरकारचे सर्वच घटक पक्ष हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाबाबत लवकरच भूमिका स्पष्ट करतील, मात्र या निवडणुका स्थानिक पातळीवर होत असल्याने सर्वच पक्षांना आपल्या कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार करावा लागतो असे बोलत मैत्रीपुर्ण व स्वतंत्र लढण्याचे संकेत दिले. तर येत्या २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघातून आपण रिंगणात राहणार असल्याची भुमिका राष्ट्रवादी काँग्रेस(अप)चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केली. ते त्यांच्या रामनगर येथील निवासस्थानी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीशी गुरुवार २ जानेवारी रोजी संवाद साधताना बोलत होते.

राज्यातील महायुती सरकार शेतकरी, शेतमजुर, सर्व सामान्य जनतेचे सरकार आहे.आम्ही नेहमीच जनतेच्या पाठीशी राहिलो आहेत, महायुती सरकार जाहीरनाम्यातील सर्व वचने पूर्ण करेल अशी ग्वाही देत जिल्ह्याच्या व शहराच्या विकासाकरीता जे लोकप्रतिनिधी निवडून गेले त्यांना जनतेने जॉब विचारायला हवे असेही म्हणाले.

पटेल पुढे म्हणाले, हे सरकार सर्व आश्वासनांची पूर्तता करेल. नवनव्या योजनांची आखणी करून राज्याला प्रगतीपथावर नेणार, आगामी दोन–चार दिवसांत पालकमंत्र्यांच्या जिल्हानिहाय नियुक्त्या होतील. पालकमंत्री कोण असेल हे ठरवायला मी काही सरकारमध्ये नाही, मात्र मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रीच पालकमंत्र्याची निवड करतील व जिल्हावासीयांच्या उत्कंठेलाही पुर्णविराम लागेल, महायुतीचे सरकार नव्या वर्षात नवे संकल्प करून राज्याला समृद्धीकडे नेईल असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला. येत्या एप्रिल–पासून लाडक्या बहिणींना २१०० रुपये, धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २०००० रुपये, याशिवाय इतरही आश्वासनांची वाचनपूर्ती करू असे पटेल यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भूमिकेवर मी स्वतः व अजित पवार बोलल्यानंतर इतरांच्या बोलण्याला महत्व नाही

दरम्यान दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावर बोलतांना पटेल म्हणाले की पवार कुटुंब एकत्र यावे, ही सर्वांचीच ईच्छा आहे. याकरीता चर्चा होत असेल तर त्यात वाईट काहीच नाही. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भूमिकेवर मी स्वतः किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार बोलले की त्यानंतर कुणीही बोलला तरी त्यास महत्व नाही असे अमोल मिटकरी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणावर रोहीत पवार व जितेंद्र आव्हाड यांचा विरोध असल्याचे केलेल्या वक्तव्याचा आधार घेत भूमिका मांडली.

# हवामानावर आधारित पीक विमा योजनेची अंमलबजावणी करा-खा.प्रशांत पडोळे



**तिरोडा:** गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील शेतकरी सध्या बदलत्या हवामानामुळे अडचणीत आहेत. यासाठी हवामानावर आधारित पीक विमा योजना राबविण्यात यावी. कृषी विषयक विविध योजना राबविण्यात याव्या अशी मागणी खा. प्रशांत पडोळे यांनी वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री आशिष जायस्वाल यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

यावेळी खॉ.डॉ.प्रशांत पडोळे यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या याबाबत जायस्वाल यांच्यासह चर्चा केली. भंडारा–गोंदिया जिल्ह्यात सिंचनाच्या सुविधा वाढवणे आवश्यक आहे. कृषी पंपाची संख्या वाढविणे आणि सौर पंपाच्या वाटपावर आपल्याला भर द्यायला हवा. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना व नागरिकांना तत्काळ मदत मिळण्याची गरज असते. मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित अनेक प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन त्या जलदगतीने सोडविण्याकरिता आपल्याला प्रयत्न करावे ला–गेल. भंडारा व गोंदिया जिल्हा न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या खूप आहे. त्यामुळे न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेची गती वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करावे. जिल्ह्यातील कामगारांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण मिळावे. बांधकाम कामगारांकरिता सरकारद्वारे सुरु करण्यात आलेल्या विविध योजनांच्या फायदा प्रत्येक गरजू व्यक्तीला मिळा–लाच पाहिजे याचा आढावा घेणे आवश्यक आहे. कागगारांना वाटप करण्यात आलेल्या किट व विविध वस्तूंच्या दर्जा हा चांगला असला पाहिजे हे सुनिश्चित करण्यासाठी आपल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घ्यावी लागेल. यासह विविध विषयांवर जयस्वाल यांच्यासह चर्चा केली. काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, उपाध्यक्ष राधेलाल पटले, योगेश अग्रवाल, प्रदेश प्रतिनिधी लक्ष्मीनारायण दुबे उपस्थित होते.

# मोहाडी ग्रामपंचायत येथे स्वामित्व योजनेतून प्रॉपर्टी कार्डचे वितरण



**गोरेगाव:–** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास महसूल विभाग व भूमी अभिलेख विभागामार्फत ड्रोन सर्व्हेद्वारे करण्यात आलेल्या स्वामित्व योजनेतून प्रॉपर्टी कार्डचे वितरण शुक्रवारी ग्रामपंचायत मोहाडी येथे सरपंच नरेंद्र चौरागडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रॉपर्टी कार्डचे महत्व सांगताना या स्वामित्व योजनेतून मिळणाऱ्या प्रॉपर्टी कार्डाला खूप मोठे महत्व आहे. आता मालमत्तेवर सुलभतेने कर्ज काढणे सोपे होईल. मालकीचा पुरावा असल्याने मालमत्तेचे विवाद कमी होणार, ग्रामपंचायतला सुद्धा कर आकारणी करणे शक्य सुलभ होऊन गावविकास साध्य होणार आहे. काही उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होणार आहे. ग्रामीण भागा–तील घरांना पक्के मालकी हक्क मिळणार असल्याचे सांगितले. यावेळी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष लिखिराम बघेले, सदस्य भिवराज शेंडे, सुरजलाल येळे, रामलाल बघेले, चैतराम धपाडे व गावकरी उपस्थित होते.

# १६ पोलिस ठाण्यातील ८१० गावांमध्ये दारुबंदी

**गोंदिया:–** जिल्ह्यातील १६ पोलिस ठाण्यातंर्गत १ हजार १०१ गावांपैकी ८१० गावांमध्ये दारुबंदी करण्यात आली आहे. त्यामुळे दारुबंदी संदर्भात जिल्ह्यातील तंटामुक्त समित्या व महिला मंडळ किती सजग आहेत, याची प्रतिची येते.

दुर्धर आजारामुळे एकाच व्यक्तीचा मृत्यू होतो. परंतु दारुमुळे दारु पिणाऱ्यांचे अख्खे कुटूंब उद्धस्त होते. यासाठी दारुविरोधात एल्गार पुकारण्यात महिला मंडळी अग्रेसर असतात. गावागावांत दारुविरोधात महिलांनी मोहिम छेडली आहे. ग्राम पंचायत प्रशासनावर दबाव टाकून दारुबंदी न केल्यास निवडणुकीत सहकार्य करणार नाही, अशी भूमिकाही महिला घेत आहे. परिणामी आपली मते खराब होणार नाहीत, याची काळजी घेत दोन, चार दारुविक्रेत्यांविरोधात गावात दारुबंदीसाठी ठराव ठराव घेतले जात आहे. त्याची अंमलबजावणी देखील होताना दिसून येत आहे.

परिणामी जिल्ह्यातील ८१० गावांमध्ये दारुबंदी केल्याची बाब पुढे आली आहे. महाराष्ट्र शास–नाने महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेला शासन निर्णयात गा–वातील अवैध धंदे करणाऱ्यांचे धंदे बंद पाडून त्यांना सन्मानाच्या रोजगाराकडे वळविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार तंटामुक्त समित्यासुद्ध गावात दारुबंदी करण्यासाठी सरसावल्या असून महिलांच्या दारुबंदीच्या पुढाकाराला पाठींबा देत आहेत. तसेच दारु विकणाऱ्यांचे धंदे बंद क३न त्यांना गावात सुरु होणाऱ्या रोजगार हमी योजनेच्या कामावर प्राधान्य देत आहेत.

दारुमुळे पैशाचा अपव्यय होऊन गृहकलह देखील वाढतात. त्यामुळे महिलांनी दारुबंदीसाठी पुढाकार घेतल्याने ८१० गावांमध्ये दारुबंदी करण्यात आली. या गा–वातील दारु पिणाऱ्यांच्या पैशाची बचत झाली. दारुबंदी झाल्याने समाजातील वाद व कौटुंबिक वादही कमी झाले. दारुबंदीमुळे गावातील वातावरण आता सुधारत असून आशादायी चित्र निर्माण झाले आहे.

# अतिदुर्गम, नक्षलग्रस्त इळुकचुवा येथे पोलिसांची ग्रामभेट



**देवरी:–** जिल्हा पोलिस दल व बिजेपार येथील सशस्त्र दुरक्षेत्रातर्फे पोलिस दादालोरा एक खिडकी एक हाथ मदतीचा योजनेअंतर्गत अतिदुर्गम व नक्षलग्रस्त ईळुकचुवा येथे ग्रामभेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचे आश्वासन पोलिस प्रशासनाने दिले. तसेच शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

देवरी तालुक्यातील इळुकचुवा येथील प्रभुलाल ग्यानीराम आचले यांच्या घरी ग्रामभेट आयोजीत करण्यात आली होती. ग्रामभेटीत जनतेशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. यात प्रामुख्याने इळुकचुवा ते पुराडा देवरी जाणेकरिता बस सेवा उपलब्ध करण्यात यावी, गावातील मुले व मुली शैक्षणीक, शारिरीक व सामाजीक दृष्टीने प्रबळ व्हावे याकरिता गावात खेळण्याकरिता क्रिडा मैदान व वाचनालयाची शासकीय स्तरावर सोय करण्यात यावी. गावात पिण्याचे पाण्याकरिता सौर उर्जेवर चालनारी मोटार पंप असून पाणी टंकी व्दारे पाणी पुरवठा होत असतो, परंतु ही सुविधा अपुरी पडत असल्याने पाण्याची पुर्णपणे पुर्तता होत नाही. त्यामुळे अधिकची पाणी टंकी व मोटार पंपाची व्यवस्था करण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश आहे. प्रसंगी या समस्या वरीष्ठांना कळवून त्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन यावेळी पोलिसांनी दिले. यावेही ग्राप सदस्य आसाराम कुंभरे प्रामुख्याने उपस्थित होते. दरम्यान परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडीला भेट देवून पाठ्यपुस्तक, ड्राईंग बुक, पाणी बॉटल, अल्पोहार आदीचे साहित्य सशस्त्र दुरक्षेत्र बिजेपारच्या वतीने वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक यू. डी. नोळे, आंगणवाडी सेविका कल्पना टप्पे व ग्रामस्थ उपस्थित होते. आयोजनासाठी पोलिस उपनिरिक्षक पांढरे, कोरचे, पोलिस नायक बरईकर, पोलिस शिपाई शहारे, वाढीवे आदींनी सहकार्य केले.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरु

## किमान वेतन फरकाच्या रकमेवरुन वाद, पंचायत समितीच्या आवारात निदर्शने



**गोरेगाव:** ग्रामपंचायत कर्मचारी युनियन शिष्टमंडळाच्या मागणीकडे पंचायत समिती गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी दुर्लक्ष करीत मनमर्जीने सुधारित किमान वेतन फरकाची रक्कम बँक खात्यात जमा केली. या विरोधात ग्रामपंचायत कर्मचारी युनियन सोमवारपासून (दि.६) बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन फरकाची रक्कम सप्टेंबर २०२० ते मे २०२१ या ९ महिन्यांची रक्कम जिल्हा परिषदेने पंचायत समिती गोरेगावला वर्ग केली. वेतन फरकाची रक्कम वाटपाचे मार्गदर्शक सुचना राज्य व्यवस्थापन कक्ष पंचायतराज पुणे यांना दिले असून सुद्धा पंचायत समितीने (ईआरपी) संगणक प्रणालीची शहानिशा मर्जीनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात अन्यायकारक निधी जमा करण्यात आला. युनियनने यावर आक्षेप नोंदवून गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत यांच्याशी चर्चा करुन ईआरपीनुसार रक्कम देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. पण याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना युनियनने निवेदन देत गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना बोलावून चर्चा करण्याची विनंती केली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांना बोलावून युनियनसमक्ष चर्चा करुन, दिशा निर्देशानुसार रक्कम वाटण्याचे निर्देश दिले.

तरी सुद्धा गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी निर्देशांचे पालन केले नाही. या विरोधात ग्रामपंचायत कर्मचारी युनियनच्या वतीने सोमवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनचे जिल्हा सचिव छगन अग्रेल यांनी दिली आहे.

### आंदोलनात यांचा सहभाग

**पंचायत समिती गोरेगाव येथील पटांगणात आयोजित कामबंद आंदोलनात महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनचे तालुका अध्यक्ष धर्मराज काळसर्पे, मार्गदर्शक प्रकाश रंगारी, उपाध्यक्ष माधव सेऊतकर, कोषाध्यक्ष नीलकंठ कोल्हटकर, सहसचिव खेमराज खांडवाये, संघटक सुनील शहारे, महिला प्रतिनिधी तारा परसमोडे, रेखा लांजेवार, सदस्य चंद्रहास पारधी, रामेश्वर कटरे, धर्मेंद्र शिंगाडे, रणजीत मेश्राम, राजकुमार साखरे, सच्चिदानंद भावे, भुमेश्वर बोपचे यांचा सहभाग होता.**

# विधानसभा क्षेत्रातील विकासकामे वेळेवर करा-आ.विजय रहांगडाले



**तिरोडाः–** तिरोडा–गोरेगाव विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचा आढावा घेत ती कामे तातडीने पुर्ण कर्यासंदर्भात तसेच क्षेत्रातील विविध समस्या मार्गी लावण्याकरिता जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभाग प्रमुखांसोबत आमदार विजय रहांगडाले यांनी आढावा बैठक घेतली. यामध्ये प्रामुख्याने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लाभ वेळेवर देण्याबाबत आदेश देण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते व पुलाचे कामे मुदतीच्या आत करण्यात येवून दर्जेदार कामांकडे विशेष लक्ष देणे, जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील सर्वे कामे सुरु करण्यात यावे.तिरोडा गोंदिया राष्ट्रीय महामार्ग लवकर पूर्ण करण्यात यावे, अदानी पॉवर लिमिटेड समोर मोठ्या प्रमाणात रस्ता खराब असून राखेच्या वाहतुकीमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने त्वरीत दुरुस्त करण्यात यावे. इंग्रजकालीन पोंगेझरा येथे भौतिक सुविधांचा विकास करणे, निमगाव (आंबेनाला) प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे आदी महत्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रामुख्याने जिल्हाधिकारी प्रजीत नायर,मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगंनाथम व संबधीत सर्व विभागाचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# राष्ट्रीय शिक्षण धोरणांविरोधात एल्गार उभारा

## रमेश बिजेकर यांचे आवाहन, पुढील दिशा ठरविण्यासाठी शासकीय विश्रामगृहात घेतली बैठक



**गोंदिया:** जिल्हा शिक्षण बचाव समन्वय समितीच्यावतीने शासकीय रेस्ट हाऊसमध्ये विविध संघटनांची एकत्रित बैठक नुकतीच पार पडली.या बैठकीत २५ व २६ जानेवारीला दोन दिवसीय शिक्षण हक्क व संविधान परिषद घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पूर्व विदर्भातील ५ जिल्ह्यांचे प्रतिनिधी या परिषदेत समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. परिषदेची मुख्य भूमिका रमेश बिजेकर यांनी मांडली. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा तीव्र प्रश्न उभा झाला आहे. शाळा संकूल आणि दत्तक योजनेतून गावच्या शाळा बंद करण्याचा व सरकारी शाळांचे खासगीकरण करण्याचा सरकारचा डाव आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा भाग म्हणून शिक्षण बंदीचे धोरण सरकार राबवित आहे. संविधान व शिक्षण हक्क कायदा डावलून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जात आहे. याविरोधात एल्गार उभारण्याची गरज असून गोंदिया जिल्ह्यात शिक्षण हक्क व संविधान परिषद घेत असल्याचे शिक्षण बचाव समन्वय समितीचे राज्य समन्वयक रमेश बिजेकर यांनी सूचना केली.

या परिषदेचे उद्‌घाटक म्हणून प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ श्रीनिवास खांदेवाले असणार आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागातून शिक्षण अभ्यासक व संविधान अभ्यासक या परिषदेत सहभागी होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या बैठकीत शिव, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीचे सी.पी.बिसेन, भुमेश ठाकरे, प्रकाश पंचभाई, यशवंत रामटेके, कैलाश भेलावे, रवी भांडारकर, उमेश कटरे, मनोज मेश्राम, मनोहर भावे, जी.डी.राऊत, सुनील बडगे, सचिन नांदगाये, अरुण बनाटे, वैशाली कांबळे, हंसा बावनकर यांनी मनोगत व्यक्त केले. शासन शिक्षणाचे क्रयवस्तूकरण करुन त्याच्या व्यापारीकरणाला प्रोत्साहन देत आहे. शिक्षण हे विक्रीय वस्तू आहे, अशी सार्वत्रिक मानसिकता तयार करण्यात भांडवलदार यशस्वी झाले आहेत.

### संवैधानिक मूल्यांची पायमल्ली

**आर्थिकदृष्ट्या गरीब, सामाजिकदृष्ट्या खालावलेला, शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या एक मोठा जनसमूह भारतात आहे. सार्वत्रिक शिक्षण, सर्वांना समान दर्जाचे शिक्षण आणि मोफत शिक्षण हा त्यांचा हक्क आहे. शिक्षण बाजार व्यवस्थेला जोडले गेल्यास त्यांच्या विकासाची दारे बंद होतील आणि समानता नष्ट होईल. उच्च जातवर्गीय समूहांना सर्वाधिक आणि उत्कृष्ट वाटा तर निम्न जातवर्गीय समूहांना अत्यल्प व निकृष्ट वाटा मिळेल. ज्याच्याकडे शिक्षण विकत घेण्याची क्षमता तो शिक्षण विकत घेईल आणि जो क्षमताहीन आहे तो शिक्षण प्रवाह–ातून बाहेर फेकला जाईल. असे होणे हे भारतीय संवैधानिक मूल्यांची आणि अविरत संघर्षातून मिळालेल्या अधिकरांची पायमल्ली ठरत आहे. म्हणूनच शिक्षण हक्काचे संरक्षण करणे आणि शिक्षण क्षेत्राचे धार्मिकीकरण आणि व्यापारीकरणाला विरोध करणे ही राज्यस्तरीय शिक्षण हक्क व संविधान परिषदेची भूमिका आहे.**

### सर्वांना समान शिक्षण मिळणे आवश्यक

**शोषणमुक्त, समताधिष्टीत आणि बंधुतेवर आधारित समाजनिर्मितीच्या दिशेने सर्वांना शिक्षण व समान शिक्षण मिळणे आवश्यक असून त्यासाठी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा या परिषदेचा आग्रह असणार आहे. संचालन अतुल सतदेवे यांनी केले तर उपस्थितांचे आभार वसंत गवळी यांनी मानले. बैठकीत आलेल्या विषय सूचनांची नोंद करुन येत्या २५ व २६ जानेवारीला आयोजित होणाऱ्या परिषदेत सामील करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.**

# सरकारकडे लाडक्या बहिणींसाठी पैसे; पण शिक्षकांसाठी नाही-आ.अडबाले

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे गोंदिया जिल्हा अधिवेशन



**गोंदिया :–** शासनाने निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील लाडक्या बहिनींसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करून त्यांना लाभ दिला. पण, उद्याचे भविष्य घडविणारे आमचे राज्यातील शिक्षक– शिक्षकेत्तर कर्मचारी हे टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्यासाठी फ्क्त ९२६ कोटींची तरतूद मागते आहे, जुनी पेन्शन योजना मागते आहे, त्यांच्यासाठी सरकारकडे पैसे नाही, ही शोकांतिका आहे, अशी टीका विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी केली.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ गोंदिया जिल्हातर्फे शिवराम विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, मरामजोब (ता. देवरी, जि. गोंदिया) येथे ५ जानेवारी २०२५ रोजी गोंदिया जिल्हा अधिवेशन पार पडले. त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून आमदार सुधाकर अडबाले बोलत होते.

अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे होते. स्वागताध्यक्ष म्हणून प्राचार्य डी. एस. हुकरे होते. याप्रसंगी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष अरविंद देशमुख, जगदीश जुनगरी, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, विमाशि संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, गोंदिया विज्युक्ताचे अध्यक्ष पवन कटरे, अरविंद शरणागत, प्रभाकर व्हाटे सर, चंद्रपूर महानगर कार्यवाह सुरेंद्र अडबाले, गोंदिया जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गुप्ता, जिल्हा कार्यवाह संदीप मांढरे, भोजराज फुंडे, धनराज राऊत, प्राचार्य जी. एम. मेश्राम, प्राचार्य महेंद्र मेश्राम, प्राचार्य रजिया बेग, मुख्याध्यापक एस. बी. दुबे, प्राचार्य विनोद गिरीपुंजे, योगिनी हूकरे, चुटे मॅडम, मुनघाटे मॅडम, रतन वासनिक व मोठ्या संख्येने प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांचे गोंडी नृत्याने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार डायगव्हाणे सर, अरविंद देशमुख, रमेश काकडे, वितेश खांडेकर, भोजराज फुंडे, पवन कटरे, प्राचार्य डी. एस. हुकरे आदींनी शिक्षण क्षेत्रातील समस्यांवर प्रकाश टाकला.

पुढे बोलतांना आमदार सुधाकर अडबाले म्हणाले, शिक्षक हे समाजाचे आधारस्तंभ आहेत. याच शिक्षकांनी मला मतद–ानरुपी आशीर्वाद देऊन सभागृहात पाठविले. त्यामुळे त्यांचे हक्क व न्याय कायम राखणे ही माझी जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी आहे.

शिक्षकांच्या रास्त समस्या सोडवण्यासाठी मी अविरत सभागृहात आवाज उठवत राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षकांचा शाल, श्रीफळ, सन्म ानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक विमाशि संघ जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गुप्ता यांनी केले. अहवाल जिल्हा कार्यवाह संदीप मांढरे यांनी वाचन केले. संचालन राजेश देशपांडे, दिलीप ढवळे यांनी तर आभार बारसे सर यांनी मानले. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी शिवराम विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी, विमाशी संघ जिल्हा, तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.